लोकमत

# नानाजी जोशी महाविद्यालयात सायबर सुरक्षेबाबत जनजागृती

लोकमत न्यूज नेटवर्क

**शहापूर :** ‘सायबर शिक्षा फॉर सायबर सुरक्षा’ या अंतर्गत शहापूर येथील नानाजी जोशी विद्यालय व महाविद्यालयात विद्यार्थ्यांना जे. एम. पटेल कॉलेज भंडाराच्या संगणकशास्त्र विभागाचे विवेक थोटे व गोकुळ नंदनवार या विद्यार्थ्यांनी सायबर सुरक्षेविषयी मार्गदर्शन करत सायबर सुरक्षेची गरज अधोरेखित केली.

मोबाइलचा वापर करत असताना इंटरनेट व सायबर सुरक्षित व सतर्क राहणे गरजेचे असते, हेदेखील त्यांनी उदाहरणासह पटवून दिले. सायबर वॉरिअर विवेक थोटे व गोकुल नंदनवार यांनी विद्यार्थ्यांना सायबर सुरक्षेबाबत इत्थंभूत माहिती देऊन स्वतःला व स्वतःच्या परिवाराला कसे सुरक्षित राहावे याबाबत अतिशय उत्कृष्टपणे मार्गदर्शन केले.

क्विक हिल फाउंडेशनचे नागेश तलारी व डॉ. प्रवीण घोसेकरदेखील उपस्थित होते. मुख्याध्यापक प्रा. सुरेश चांदेवार यांनी मार्गदर्शन केले. फाउंडेशनच्या अनुपमा काटकर व अजय शिर्के यांचे आभार मानले. आयोजन विभागप्रमुख प्रा. दिलीप सुहाम, शिक्षक प्रा. प्रसन्ना थोटे व प्रा. घनश्याम उरकुडे, प्रा. झंझाड, प्रा. राऊत, प्रा. ऊके, प्रा. मुरकुटे, प्रा. मेश्राम, प्रा. कारेमोरे, शिंदे, चिंधालोरे व शिक्षकेतर कर्मचारी यांनी केले होते.